# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक: सीटीटी-०९२०/सीआर-४६/२०१९/तीन दिनांक: २१ जानेवारी, २०२१

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय**:- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

शासन सेवेतील विविध पदावरील निवडीकरीता शासनाकडून मागणीपत्रांद्वारे प्राप्त होणारा विभिन्न प्रवर्गातील रिक्त पदांचा तपशील व निवडप्रक्रियेसंदर्भातील राज्य शासनाचे त्या त्या वेळचे धोरण, यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवडप्रक्रिया राबविल्या जातात. राज्य शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी लागू करण्यात आलेल्या आरक्षणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाकडून दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० रोजी आरक्षणाच्या अमंलबजावणीस स्थगिती देण्यासंदर्भात अंतरिम आदेश देण्यात आले. सदर आदेशामुळे आयोगाकडे विविध टप्प्यांवर प्रलंबित असलेल्या निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी येणा-या अडचणी लक्षात घेता या निवडप्रक्रियांबाबत कोणत्या पद्धतीने पुढील कार्यवाही करावी, यासाठी आयोगाकडून दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे विचारणा करण्यात आली. आयोगाकडील विविध प्रलंबित निवड प्रक्रिया पूर्णत्वास नेण्यात आलेल्या अडचणी तसेच या निवडप्रक्रिया आयोगाच्या वेळापत्रकाच्या दृष्टीने वेळीच पूर्ण करता याव्यात, या हेतूने योग्य निर्देश प्राप्त होण्यासाठी आयोगाकडून मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये Interlocutory Application दाखल करण्यात आले होते.

**२.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ अनुज्ञेय ठरविण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक २३ डिसेंबर, २०२० अन्वये शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे. या व इतर अनुषंगिक बाबी लक्षात घेता मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेले Interlocutory Application मागे घेण्याबाबत आयोगाने निर्णय घेतला आहे व या संदर्भात आयोगाच्या संबंधित अभियोक्ता यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सहसचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण: मुंबई